सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# नगर विकास विभाग
# कार्यालय नगर परिषद, काटोल
## जिल्हा–नागपूर

Phone: 07112222593, 07112222101 email:n.p.katol@gmail.com
Toll Free No- 18008430443 Website- https://katolmahaulb.maharashtra.gov.in

जा. क्र. नपका / बा.वि. / 838 / 2021 दिनांक 25 / 08 / 2021.

**कामाचा आदेश**–

प्रति,

श्री. प्रमोद मोतीबाबा घाडगे,
कंत्राटदार, काटोल.

**विषय**:– **Construction of tower A1 42 EWS D/Us on S. No. 806 for M.C. Katol, Tah.-Katol, Dist.-Nagpur (Under Pradhan Mantri Awas Yojna-A.H.P.)**

संदर्भ:– 1) आपण Tender Id - **2021_DMA_691060_1** नुसार सादर केलेली ई–निविदा.
2) आपले पत्र दि. 13 / 07 / 2021.
3) नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि. 28 / 07 / 2021 ठराव क्र. 24.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपण विषयांकित कामाची संदर्भ क्र. 1 अन्वये सादर केलेली निविदा, संदर्भ क्र. 3 चे ठरावान्वये खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे नांव | Construction of tower A1 42 EWS D/Us on S. No. 806 for M.C. Katol, Tah.-Katol, Dist.-Nagpur (Under Pradhan Mantri Awas Yojna-A.H.P.) |
| 2 | निविदा मंजूर सभा | नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि. 28 / 07 / 2021 ठराव क्र. 24 |
| 3 | मंजूर निविदा दर | रू. **24,666 / –** प्रती चौरस मीटर (सदनिकेचे कारपेंट क्षेत्रफळ) |
| 4 | एकूण निविदा किंमत | रू. **3,10,79,160 / – फक्त** |

करिता या द्वारा आपणांस आदेश देण्यात येतो की, विषयांकित काम खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून त्वरीत सुरु करण्यात यावे.

**अटी व शर्ती**–

1. विषयांकीत काम आपणांस **रू. 24,666 / – प्रती चौरस मीटर दराने** (सदनिकेचे कारपेट क्षेत्रफळ) (मंजुर निविदा दराप्रमाणे) (इलेक्ट्रीफीकेशन व प्लंबींग सहीत) संपूर्ण काम करावे लागेल. या दरामध्ये सोलर पॅनल तसेच इमारती बाहेरील इंन्फ्रास्ट्रक्चर चे काम अंतर्भूत राहणार नाही. इतर अटी व शर्ती ई–निविदा प्रसिध्द व प्रपत्र बी–1 करारनाम्याच्या लिहुन दिल्याप्रमाणे लागू राहील.
2. विषयांकित कामासाठी Price excalation clause ही अट लागु राहणार नाही.
3. विषयांकित कामासाठी सदनिका बांधकामाचा इमारत बांधकाम नकाशा नगर रचना विभाग, नागपूर कडून मंजूर करून घ्यावा लागेल.

4. बांधकामाचे संकल्पचित्र स्ट्रक्चरल डिझाईनरकडून तयार करून त्यास शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय/VNIT नागपूर या तांत्रीक संस्थेकडून तांत्रीकदृष्टया प्रमाणित करावे लागेल. त्याप्रमाणे काम करून द्यावे लागेल.
5. सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्पेशिफीकेशन प्रमाणे करावे लागेल.
6. त्रयस्थ तांत्रीक लेखापरिक्षण शुल्क नगरपरिषदेद्वारा सक्षम यंत्रणेकडे जमा करेल.
7. निधीचे उपलब्धतेनुसार कामाच्या देयकाचे भुगतान करण्यात येईल.
8. कामाचे देयकातुन 2 टक्के आयकर व जी.एस.टी., 2 टक्के सुरक्षा ठेव, 1 टक्का विमा व इतर अनुज्ञेय कपाती करण्यात येईल.
9. वर नमूद मंजूर दर सर्व करासहीत असल्याने नगरपरिषदेकडून मंजूर दराव्यतिरीक्त कोणतीही रक्कम अदा करण्यात येणार नाही.
10. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकर अधिनियम 1998 अंतर्गत आपले सदर बांधकामाच्या एकुण मुल्याचे 1 टक्का रक्कम उपकरापोटी जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा देयकामधुन कपात करण्यात येईल.
11. इ.पी.एफ. अधिनियम 1952 नुसार कामगारांचा ई.पी.एफ.जमा करण्यांत आल्याचे चालान कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. ई.पी.एफ. ॲक्टचे पुर्णपणे पालन करावे लागेल.
12. दोष दायीत्व कालावधी शासन निर्णय नुसार 10 वर्षापर्यंत राहील.
13. इमारतीचे शासकीय विमा सर्टीफीकेट आदेश व अन्यथा देयकातून कपात करण्यात येईल.
14. सदर काम प्रगतीपथावर असतांना अथवा काम पुर्ण झाल्यांनतर कामाचे दर्जात त्रृटया आढळल्यास अथवा दक्षता व गुणनियंत्रण मंडळाचे चौकशीमध्ये कामाचे दर्जात त्रृटया सूचविण्यात आल्यास व कोणतीही आर्थीक भरपाई सूचविल्यास ती भरपाई करण्याची सर्वस्वी जबाबदारी व त्रृटयाची पुर्तता करण्या जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
15. बांधकामाकरीता लागणा–या साहित्यावर रॉयल्टी व इतर कर भरण्याची जबाबदारी आपली राहील.
16. नकाशे व अंदाजपत्रकाचे विनिर्देशाप्रमाणे बांधकाम करावे लागेल. यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
17. विषयांकित कमासाठी कामाचा कालावधी **12 महिने (पावसाळासह)** राहील.
18. दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न झाल्यास प्रति दिवस **रू. 500/–** प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
19. नैसर्गिक आपत्तीस नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.
20. काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने सादर केल्यानंतर त्यापुढील सहा महिन्याच्या काळातील कामाची दुरूस्ती कंत्राटदाराला स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.
21. बांधकामावर या कामाचे नगरपालीकेने देखरेखकरीता नियुक्त केलेले वास्तुज्ञ तसेच नगरपरिषद अभियंता यांनी दिलेल्या सुचनांचे व आदेशांचे तंतोतंत पालन करावे लागेल. साईटवर व्हिजिट बुक ठेवावे लागेल.
22. उपरोक्त कामाविषयी दर्शनी भागात "सुचना फलक" स्वखर्चाने लावावे लागेल. (सूचना फलकचा नमुना सोबत जोडलेला आहे)
23. लेबर कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट नुसार दिलेल्या हमीपत्राचे तंतोतंत पालन करावे लागेल.
24. या कामाकरीता कोणतेही साहित्यावरील भाववाढ (एक्सलरेशन चार्जेस) अनुज्ञेय राहणार नाही.
25. स्थायी निर्देश क्र.–37 अन्वये परिशिष्ट–ब नुसार या कामाकरीता आवश्यक असलेले साहित्य गुण नियंत्रण चाचण्या शासनमान्य प्रयोग शाळेकडुन करून घेणे बंधनकारक आहे व त्याचा खर्च आपणासच करावा लागेल.
26. बांधकामाचे थर्ड पार्टी ऑडीट करून घेण्यासाठी लागणारा खर्च नगरपरिषद द्वारा करण्यात येईल. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट शिवाय अंतिम देयकाचे प्रदान करण्यात येणार नाही.
27. कामावर भेट पुस्तिका ठेवावी लागेल. कनिष्ठ अभियंता यांचे निरक्षण शिवाय कॉंक्रीट करण्यात येवू नये.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, काटोल

(F-lck-pwd-work order-20 to 21)

# MUNICIPAL COUNCIL KATOL, DIST-NAGPUR

E-Mail- n.p.katol@gmail.com

Phone No- 07112-222101


No MCK/PWD/809/2022
Date :-31 /10 /2022

प्रति,

श्री प्रमोद मोतीबाबा घाडगे,
कंत्राटदार, काटोल

विषय :– प्रधानमंत्री आवास योजनेचे (घटक क्रमांक 3) ए.एच.पी.घटक अंतर्गत शेत सर्व्हे क्रमांक 806 येथे टॉवर A, - 42 सदनिकांचे बांधकामास मुदतवाढ मिळण्याबाबत.

संदर्भ :– आपला प्राप्त अर्ज क्रमांक 4759, दिनांक– 19/9/2022

उपरोक्त सदंर्भांकित अर्जानुसार विषयांकीत बांधकामास आपण 24 महिन्यांची मुदतवाढ मागितलेली आहे. या कामाचा आदेश आपणास दिनांक 25/08/2021 ला देण्यात आलेला असून कामाचा आदेश व करारनाम्यानुसार या कामाची मुदत 12 (बारा) महिने देण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक– 25/8/2022 ला सदर मुदत संपलेली आहे. परंतु या कामाची मा.जिल्हाधिकारी,नागपूर यांचेकडे झालेल्या तक्रारीनुसार दिनांक 18/1/2022 ला आपणास या कामावर स्थगिती देण्यात आलेली होती. त्यामुळे सदर बांधकाम पुर्णपणे बंद करण्यात आलेले होते. परंतु या तक्रारीचा निपटारा झालेला असुन आपणास दिनांक 5/7/2022 ला सदर बांधकाम सुरू करण्याचा आदेश या कार्यालयाकडून देण्यात आलेला आहे. परंतु या कालावधीत पावसाळा सुरू असल्यामुळे आपणास पुढील काम करता आलेले नाही. वरीलप्रमाणे स्थिती लक्षात घेता आपणास विषयांकीत बांधकामास दिनांक– 25/08/2024 पर्यत मुदतवाढ देण्यात येते. तरीही आपण त्वरीत पुढील बांधकामास सुरूवात करावी व दिलेल्या मुदतीत विषयांकीत बांधकाम पूर्ण करावे.

Municipal Council Katol * Distt. Nagpur *

(Notice 10)

प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगरपरिषद,काटोल